दिन विशेष...
१८९८ : ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठीतील विख्यात साहित्यिक वि.स.खांडेकर यांचा जन्मदिन.
१९३४ : क्रांतिकारी मास्टर सूर्यसेन यांना चित्तगाव येथे फाशी देण्यात आली.
* पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु काकासाहेब गाडगीळ यांनी निधन.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८३,५७६.२४ -६०४.७२ (०.७२%)
डॉलर ₹ ९०.२७

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | २९ | १३ |
| दिल्ली | १७ | ०७ |
| मुंबई | ३३ | १६ |
| नागपूर | २७ | १० |
| पुणे | २८ | ०८ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ६३ किंमत : ५ रु. | पाने ४

### सुविचार

आयुष्यातलं खरं यश मेहनतीच्या जोरावर मिळतं, स्वप्नं बघा, पण त्यासाठी मेहनतही करा.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०७ संध्या-६:०६

### सोने - चांदी

| सोने (१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,४२,०९५/- | २,६०,०००/- |

### केळी भाव

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# टॅरिफची धमकी देणाऱ्या अमेरिकेला भारताने शिकवला धडा

## जागतिक राजकीय आणि व्यापारी वर्तुळात उडाली खळबळ

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

**भारत आणि अमेरिका यांच्यातील संभाव्य मोठ्या व्यापारी करारावर आता नवीन वादळ निर्माण झाले आहे. अमेरिकेचे वाणिज्य मंत्री हॉवर्ड लुटनिक यांनी एका पॉडकास्टमध्ये केलेल्या खुलाशाने जागतिक राजकीय आणि व्यापारी वर्तुळात खळबळ उडाली आहे. लुटनिक यांनी स्पष्टपणे सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना फोन केला असता तर डिसेंबर २०२५ पर्यंत दोन्ही देशांमध्ये एक मोठा व्यापारी करार निश्चित झाला असता.**



**लुटनिक यांचे मुख्य वक्तव्य**

पॉडकास्टमध्ये बोलताना हॉवर्ड लुटनिक म्हणाले, संपूर्ण डील सेट झाली होती. सर्व गोष्टी सुरळीत होत्या. पण डोनाल्ड ट्रम्प हे स्वतःच अशा डीलवर अंतिम निर्णय घेतात. त्यामुळे त्यांना अपेक्षा होती की मोदी स्वतः त्यांना फोन करतील आणि करारावर शिक्कामोर्तब करतील. मात्र मोदींनी फोनच केला नाही. ते पुढे म्हणाले, ट्रम्प यांना जगभरात मी मोदींशी बोललो आणि डील फायनल केली अशी बढाई मारण्याची संधी हवी होती. ती संधी न मिळाल्याने ते दुखावले. त्यानंतर अमेरिकेने भारतावर ५०० टक्के टॅरिफ लावण्याची धमकी दिली आहे, अशी चर्चा आहे.


**कराराचे काय झाले?**

लुटनिक यांच्या मते, भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी कराराच्या बोलण्या अत्यंत प्रगत अवस्थेत होत्या. भारताने अमेरिकेवर लावलेल्या टॅरिफनंतर दोन्ही देशांनी परस्पर हिताचे मुद्दे सोडवण्यासाठी चर्चा केली होती. सर्व गोष्टी ठरल्यास डिसेंबर २०२५ मध्ये हा करार अंतिम होणार होता. मात्र करार फायनल होण्यापूर्वीच अमेरिकेने त्यात काही बदल केले. भारताने यावर आक्षेप घेतला आणि म्हटले (पान २ वर)

# मुख्यमंत्री फडणवीसांकडून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन

## • आयोगाकडून दखल

वृत्तसंस्था । मुंबई



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप करत काँग्रेसने दाखल केलेल्या तक्रारीची महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने दखल घेतल्याचा दावा काँग्रेसने शनिवारी केला. राज्य निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी काँग्रेसकडून तक्रार प्राप्त झाल्याची पुष्टी केली असली, तरी या तक्रारीवर नेमकी कोणती कारवाई करण्यात आली आहे, याबाबत त्यांनी स्पष्ट माहिती दिली नाही.**

काँग्रेसने सांगितले की, ही तक्रार २ जानेवारी रोजी मुंबई मेट्रोमधून प्रवास करत असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी एका खाजगी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीशी संबंधित आहे. या मुलाखतीत आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला आहे. प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस धनंजय शिंदे यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, सार्वजनिक वाहतूक सुविधेचा वापर करून माध्यमांना मुलाखत देणे हे आचारसंहितेच्या विरोधात आहे. तसेच, सरकारी यंत्रणांचा संभाव्य गैरवापर झाल्याचीही चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

काँग्रेसने ९ जानेवारी रोजी राज्य निवडणूक आयुक्तांना अंतिम स्मरणपत्र सादर करत व्हिडिओ पुरावे आणि संबंधित कायदेशीर तरतुदीही (पान २ वर)

### थोडक्यात

#### बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या अध्यक्षपदी तारिक रहमान

**ढाका ।** बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे पुत्र तारिक रहमान यांची आज बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. खालिदा झिया यांच्या मृत्यूनंतर पक्षाचे अध्यक्षपद रिक्त झाले होते. या पदावर तारिक रहमान यांची नियुक्ती करण्याचा निर्णय बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या स्थायी समितीने घेतला आहे. शुक्रवारी झालेल्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आला, असे स्थानिक माध्यमांनी म्हटले आहे.

#### नेवासे-शेवगाव मार्गावर अपघात

**नेवासे ।** नेवासे-शेवगाव राज्यमार्गावरील भानसहिवरे शिवारात शनिवारी (दि. १०) सकाळी सुमारे ८.४५ वाजता भीषण अपघात घडला. एका दूध डेअरीजवळ रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या राजेंद्र गंगाधर भोईटे (वय ५२, रा. भानसहिवरे, ता. नेवासे) यांना भरधाव वेगातील डंपरने जोराची धडक दिली. या अपघातात भोईटे यांचा जागीच मृत्यू झाला.

# मुंबईत फ्रीजचा भीषण स्फोट; एकाच कुटुंबातील ३ जण दगावले

वृत्तसंस्था । मुंबई



**मुंबईतील गोरेगाव पश्चिम येथील एका इमारतीत पहाटे भीषण आग लागली. या दुर्दैवी अग्निकांडात ३ जणांचा गुदमरून मृत्यू झाला, ज्यात २ पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. अग्निशमन दलाने आग विझविली असली तरी, आगीचे नेमके कारण अजून अस्पष्ट आहे. या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण असून नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे.**

गाढ झोपेत असलेल्या मुंबईकरासांठी शनिवार (१० जानेवारी)ची पहाट भयानक ठरली. गोरेगाव पश्चिमेकडील एका इमारतीत झालेल्या भीषण अग्निकांडामुळे प्रचंड खळबळ माजली. या आगीत ३ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. आगीची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले.

अग्निशमन दलाच्या जवानांनीही तातडीने धाव घेत अथक प्रयत्न करून ती आग आटोक्यात आणली. मात्र, घरात झोपलेल्या तीन जणांचा गुदमरून मृत्यू झाला. मृत नागरिकांमध्ये २ पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. यामुळे भीतीचे वातावरण असून नागरिक हळहळ व्यक्त करत आहेत. (पान २ वर)

# देवेंद्र फडणवीस अन् एकनाथ शिंदेंना घोटाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न

## गृहविभागातून धक्कादायक माहिती समोर

वृत्तसंस्था । मुंबई

**महापालिका निवडणुकीच्या काळात राजकीय नेत्यांकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत असताना राज्याच्या गृहविभागातून माजी पोलीस महासंचालकांवर गंभीर आरोप करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना २०२१ मध्ये अर्बन लँड सीलिंग (यूएलसी) घोटाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न केल्याचा त्यांच्यावर आरोप केला आहे. राज्याच्या गृह विभागाच्या एका विशेष चौकशी अहवालातून हा आरोप समोर आला. हा अहवाल नुकत्याच निवृत्त झालेल्या माजी पोलीस महासंचालक (डीजीपी) रश्मी शुक्ला यांनी त्यांच्या निवृत्तीच्या अवघ्या चार दिवस आधी सादर केला होता.**



माजी पोलीस महासंचालक संजय पांडे यांनी ठाण्याचे तत्कालीन डीसीपी लक्ष्मीकांत पाटील आणि एसीपी सरदार पाटील यांना २०१६ च्या यूएलसी घोटाळा प्रकरणात देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांना अटक करण्याचे निर्देश दिले होते. अहवालात असा दावा करण्यात आला आहे की, पांडे यांचा उद्देश हा दर्शवण्याचा होता की या दोन्ही नेत्यांनी बिल्डरांकडून पैशांची वसुली केली होती. यासाठी, वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांवर सतत दबाव आणला गेला.

विशेष चौकशी अहवालात या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या संजय पुनामिया यांनी सादर केलेल्या एका ऑडिओ क्लिपचा देखील उल्लेख आहे. या रेकॉर्डिंगमध्ये कथितरित्या एसीपी सरदार पाटील, डीजीपी संजय पांडे आणि डीसीपी लक्ष्मीकांत पाटील यांच्यात झालेली बातचीत (पान २ वर)

### ➤ राजकीय आरोप-प्रत्यारोप

**हा अहवाल समोर आल्यानंतर आता राजकीय नेत्यांकडून आरोप प्रत्यारोप होत आहेत. खासदार संजय राऊत म्हणाले की, रश्मी शुक्ला या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्याच आहेत. त्यांच्या कुटुंबातील अनेक सदस्य आरएसएसचे कार्यकर्ते आहेत. त्यामुळेच त्या या पदावर होत्या. त्यांच्या या अहवालात काही तथ्य नसल्याचा दावा राऊतांनी केला. तर मंत्री नितेश राणे यांनी या कटामध्ये जे-जे सहभागी आहेत त्यांना अटक करण्याची मागणी केली आहे.**

# ‘पोक्सो’ कायद्यात येणार ‘रोमिओ-ज्यूलिएट’ तरतूद

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

अल्पवयीन मुलांवरील लैंगिक अत्याचारांच्या विरोधात असलेल्या ‘पोक्सो’ कायद्याचा वाढता गैरवापर रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आता पुढाकार घेतला आहे. किशोरावस्थेतील मुला-मुलींमध्ये परस्पर संमतीने निर्माण झालेल्या प्रेमसंबंधांना या कठोर कायद्याच्या कचाट्यातून वाचवण्यासाठी कायद्यात विशेष ‘रोमिओ-ज्यूलिएट’फ तरतूद समाविष्ट करण्याचे निर्देश न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत. केवळ संमतीने संबंध ठेवले म्हणून तरुणांचे भविष्य उध्वस्त होऊ नये, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, पोक्सो कायदा हा मुलांच्या संरक्षणासाठी बनवलेला एक अत्यंत पवित्र कायदा आहे. मात्र, अनेक प्रकरणांमध्ये असे दिसून आले आहे की, जेव्हा दोन



किशोरवयीन मुले एकमेकांच्या प्रेमात असतात आणि त्यांच्या वयात फारसे अंतर नसते, तेव्हा कुटुंबाकडून विरोधापोटी मुलावर या कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला जातो. अशा प्रकारे सूड उगवण्यासाठी कायद्याचा वापर होणे (पान २ वर)

**• न्यायालयाने वकिलांनाही एक महत्त्वाचे आवाहन केले. खोट्या तक्रारींच्या माध्यमातून कोणाचे तरी आयुष्य उद्ध्वस्त होत असेल, तर वकिलांनी तिथे योग्य भूमिका बजावली पाहिजे. यामुळे न्यायव्यवस्थेवरील सर्वसामान्य जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल. आता केंद्र सरकार या सूचनेवर काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

# रेल्वे अधिकाऱ्यांचा ‘काळा कोट’ आता इतिहास जमा; रेल्वेमंत्र्यांचा मोठा निर्णय

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

भारतीय रेल्वेतून आता ब्रिटिशांच्या काळातील खुणा पुसून टाकण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. रेल्वे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी अनिवार्य असलेला ब्रिटिशांच्या काळातील ‘काळा कोट’ आता यापुढे अधिकृत गणवेश राहणार नाही, अशी घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. ही वेशभूषा इंग्रजांनी सुरू केली होती, परंतु आता ती आजपासूनच समाप्त करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दिल्लीत आयोजित ७० व्या अति विशिष्ट रेल्वे सेवा पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी रेल्वेमंत्र्यांनी कर्मचाऱ्यांना वसाहतवादी (पान २ वर)

# शक्तीपीठ महामार्ग राज्याच्या विनाशाचा मार्ग ठरेल; राजू शेट्टी

वृत्तसंस्था । कोल्हापूर

**मराठवाडा आणि विदर्भाचा खऱ्या अर्थाने विकास करायचा असेल, तर नव्या शक्तीपीठ महामार्गाऐवजी विद्यमान रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्गाचे सहा किंवा आठ पदरीकरण करावे, अशी स्पष्ट भूमिका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष व माजी खासदार राजू शेट्टी यांनी मांडली आहे.**



शक्तीपीठ महामार्ग हा महाराष्ट्राच्या विकासाचा नव्हे, तर आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय विनाशाचा मार्ग ठरेल, असा घणाघात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केला.

राजू शेट्टी म्हणाले की, रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्ग आधीच अस्तित्वात असताना त्याच्या समांतर शक्तीपीठ महामार्ग उभारणे म्हणजे राज्यावर अनावश्यक आर्थिक बोजा टाकण्यासारखे आहे. हा महामार्ग पुढील ९० वर्षे जनतेवर टोलचा भुर्दंड लादणारा ठरेल आणि महाराष्ट्राला कर्जाच्या खाईत ढकलेल, असा आरोप त्यांनी केला. शक्तीपीठ (पान २ वर)

### ➤ सुपीक होणार उध्वस्त

**या प्रकल्पामुळे सांगली आणि कोल्हापूर जिल्हे पुराच्या वेढ्यात अडकतील, १२ जिल्ह्यांतील सुपीक बागायती शेती उध्वस्त होईल आणि पर्यावरणाचे मोठे नुकसान होईल, असा इशाराही त्यांनी दिला. देवदेवतांच्या नावाखाली जनतेची दिशाभूल करून हा महामार्ग पुढे रेटला जात असल्याचा आरोप करत, समृद्धी महामार्गाची श्वेतपत्रिका आधी जाहीर करावी आणि त्यानंतरच शक्तीपीठ महामार्गावर चर्चा व्हावी, अशी मागणी राजू शेट्टी यांनी केली.**

# महिला सरपंचांच्या नावावर पतीचा कारभार आता चालणार नाही

## पंचायत राज मंत्रालयाचा मोठा निर्णय; सामाजिक प्रबोधन आणि मानसिक परिवर्तन महत्त्वाचे



वृत्तसंस्था । पुणे

**ग्रामपंचायतींमध्ये महिला सरपंच निवडून आल्यानंतरही प्रत्यक्षात त्यांचा कारभार त्यांचे पतीच पाहत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळते. या सरपंच पती प्रथेला आळा घालण्यासाठी आता केंद्र सरकारने कठोर पावले उचलण्याचे ठरवले आहे. महिला नेतृत्वाचे सक्षमीकरण करण्यासाठी आणि ही अनिष्ट प्रथा मुळापासून उखडून टाकण्यासाठी देशभरात विशेष मोहीम राबवून कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.**

केंद्र सरकारच्या पंचायत राज मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव सुशीलकुमार लोहाणी यांनी ही महत्त्वाची घोषणा केली. केंद्र सरकारच्या पंचायत राज मंत्रालय आणि राज्याच्या ग्रामीण विकास व पंचायत राज विभागाच्या वतीने आयोजित मॉडल वूमन फ्रेंडली ग्रामपंचायत इनिशिएटीव्ह या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन लोहाणी यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. अनेक ग्रामपंचायतींमध्ये महिला सरपंच केवळ कागदोपत्री किंवा स्वाक्षरीपुरत्या मर्यादित राहतात आणि सर्व निर्णय प्रक्रियेत पतीचा हस्तक्षेप असतो, ही बाब गंभीर असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

महिला लोकप्रतिनिधींना स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची संधी आणि त्यासाठी आवश्यक सामाजिक पाठबळ मिळणे गरजेचे असल्याचे लोहाणी यांनी सांगितले. ग्रामपंचायतींनी महिलांच्या प्रत्यक्ष सहभागासाठी सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण निर्माण करावे, असे आवाहनही त्यांनी केले. महिला स्नेही ग्रामपंचायत घडवण्यासाठी केवळ आर्थिक तरतूद पुरेशी नसून, सामाजिक प्रबोधन आणि मानसिक परिवर्तन महत्त्वाचे आहे. महिलांना बँकिंग साक्षरता, उद्योजकता, शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध करून दिल्यास त्या अधिक आत्मविश्वासाने कारभार करू शकतील, (पान २ वर)

## संपादकीय

### संधी आणि स्वयंगोल

गुरुवारी ईडीने इलेक्शन मॅनेजमेंट कंपनी आय-पॅकच्या बंगालमधील कार्यालयावर छापा टाकला. माहिती मिळाल्यावर राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी स्वत: छापा पडला त्या ठिकाणी धावल्या. ईडीच्या अधिकाऱ्यांनी जप्त केलेल्या हार्ड डिस्क ममता आपल्यासोबत घेऊन गेल्याचे सांगितले गेले. ईडीची कारवाई बदनाम आहे. ममता एकट्या ईडीग्रस्त नाहीत. त्यांनी थोडे संयमाने घ्यायला हवे होते. त्यांनी तेथे जे काही केले ते कॅमेऱ्यात कैद झाले. ममतांच्या विरोधात न्यायालयात त्याचा पुरावा म्हणून वापर होऊ शकतो. त्यांना अटक होऊ शकते. या घटनेतून बंगालमध्ये राष्ट्रपती राजवटीची चर्चा सुरू झाली आहे. तसे करून भाजप स्वयंगोल करणार की अनावश्यक आक्रस्ताळेपणा करून ममतांचा स्वयंगोल होईल हे पाहावे लागेल. तथापि, पूर्वानुभव पाहता भाजप ममता यांना पुन्हा व्हिक्टीम कार्ड खेळण्याची संधी देण्याची शक्यता कमी आहे. दहा वर्षांपासून भाजप आणि तृणमूल यांच्यात संघर्ष सुरू आहे. बंगालमध्ये बेकायदा घुसखोरांची एक वोट बँक तयार झाली असल्याचा भाजपचा आरोप आहे. या घुसखोरांमध्ये प्रामुख्याने मुस्लिमांचा समावेश आहे. तोच ममता यांचा आधार असल्यामुळे ममता दोन दशकांपासून सत्तेत ठाण मांडून बसल्या आहेत. आपला जनाधार कापण्यासाठीच एसआयआरची प्रक्रिया सुरू केली असल्याचे ममतांचे मानणे आहे. मध्येच निवडणूक आयोगानेही कहर केला. त्यांनी थेट जगप्रसिद्ध अर्थ शास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांना मतदार यादी पडताळणीबाबत नोटीस पाठवली. निवडणुकीच्या वेळीच ठरवून असल्या गोष्टी होतात, की परिणामांचा नेमका अंदाज न आल्यामुळे चुका घडतात हे कळायला मार्ग नाही. मागच्या निवडणुकीच्या वेळीही गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतीनिकेतनचा मुद्दा असाच अचानक समोर आला होता. त्यावेळी ममतांनी त्याचे राजकीय भांडवल करत निवडणूक आपल्या बाजूने फिरवली होती. दुर्गा पूजेचाही त्यांनी खूबीने वापर केला. एनआरसी, रामनवमीच्या मिरवणुका आदी मुद्दे आहेतच. याद्वारे भाजप ममतांची कोंडी करण्याचा प्रयत्न करतो. दरम्यानच्या काळात संदेशखली येथील बलात्कार प्रकरण तापले. डॉक्टर तरूणीवर बलात्कार, शिक्षक भरती घोटाळा, कोळसा खाण घोटाळा असे बरेच बंगालमध्ये झाले तरी ममतांचे स्थान अभेद्य राहिले. अत्यंत अल्प वेळात लाखोंच्या संख्येने जमाव रस्त्यावर उतरवण्याची ममतांची क्षमता ही यामागची कारणे. ईडीच्या कालच्या प्रकरणात त्यांनी संतापाच्या भरात चूक केली असली तरी हे वातावरण त्या आपल्या फायद्यासाठी फिरवण्याचा पुरेपूर प्रयत्न करतील.

# मनरेगाचे नाव बदलामुळे उद्रेक होऊ नये म्हणून भाजपकडून राम नावाचा वापर

## ● काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार यांचा पत्रकार परिषदेत आरोप; आज उपोषण

प्रतिनिधी | जळगाव

**लोकसभेत व राज्यसभेत घाईघाईने मनरेगा योजनेचे नाव बदलाचे विधेयक पास करण्यात आले. महात्मा गांधींचे नाव असलेल्या या योजनेचे नाव बदलल्यामुळे समाजात उद्रेक होऊ नये म्हणून राम नावाचा वापर केला आहे. या विरोधात आम्ही एक दिवशी लाक्षणिक उपोषण करणार आहोत. अशी माहिती काँग्रेस जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.**



पवार पुढे म्हणाले की, प्रधानमंत्रींनी कॅबिनेट मीटिंग घेत पाच दिवसात लोकसभा सदस्यांना ड्रॉप दिला आणि हे विधेयक घाईघाईत मांडून मनरेगा योजनेचे नाव बदलून विकसित भारत गॅरंटी फॉर रोजगार अँड आजीविका मिशन ग्रामीण अशी जी वाचायला सुद्धा कठीण आहे, अशा प्रकारे नावात बदल करण्यात आला. या मागचा उद्देश एकच होता की महात्मा गांधींचे नाव काढल्यामुळे देशात होणारा उद्रेक व असंतोषाला शांत करण्यासाठी या योजनेच्या नावात राम नाव आणण्याचा भाजपने अट्टाहास केला असल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, दि.११ रोजी काँग्रेस भवनसमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण तर २६ जानेवारी रोजी ग्रामपंचायत ठराव करून आम्ही याचा विरोध करणार आहोत. तसेच देशभरात ठिकठिकाणी ४५ दिवस वेगवेगळ्या स्वरुपात विकसित भारत गॅरंटी फॉर रोजगार अँड आजीविका मिशन ग्रामीण या योजनेचा विरोध करुन मनरेगा योजना पूर्ववत करावी, अशी मागणी करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**■ महात्मा गांधींच्या नावाबद्दल आकस...**

बाहेर देशात जाऊन महात्मा गांधीच्या पुतळ्याला नतमस्तक होऊन हार घालायचा आणि दुसरीकडे देशात असलेले महात्मा गांधींचे योजनेवरील नाव, विविध संस्था, शहरांना असलेली महापुरूषांची नावे बलदण्याचे खालच्या दर्जाचे राजकारण भाजप करत आहे. त्यांना महात्मा गांधींच्या नावाबद्दल जास्त आकस दिसून येतो, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

# विद्यापीठात विश्व हिंदी दिवस निमित्त पार पडले व्याख्यान

प्रतिनिधी | जळगाव

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे विश्व हिंदी दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील माजी हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ. व्ही. एन. भालेराव यांचे वैश्विक स्तरपर हिंदी के बढ़ते कदम और रोजगार के अवसर या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा.डॉ.म.सु. पगारे हे होते.

प्रा.डॉ. व्ही.एन. भालेराव म्हणाले की, आजपर्यंत हिंदी ने भारतातील प्रांतिक भेदाला एकत्रित समन्वयाने जोडण्याची भूमिका निभावली आहे. असे असले तरी संविधानिक दृष्ट्या हिंदी भाषेला आजही राष्ट्रभाषेचा दर्जा मिळालेला नसल्याने हिंदी भाषा समृद्ध असूनही युनोपर्यंत पोहोचू शकत नाही. परंतु तरीदेखील १९७५ मध्ये झालेल्या पहिल्या विश्व हिंदी संमेलनाने हिंदी भाषेला वैश्विकीकरणाकडे न्यायला मदत मिळाली. हिंदी भाषा ही साधी असल्याने ती संपर्क आणि समन्वय करण्यासाठी सोपी जाते. त्यामुळे प्रादेशिक भाषेच्या तुलनेत भारतात हिंदी बोलणाऱ्यांची संख्या अधिक आहे. हिंदीमध्ये रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. ज्यात बँकिंग क्षेत्रात हिंदी भाषेचा अधिकारी म्हणून तसेच हिंदी चित्रपट व्यवसायात पटकथा लेखक, अनुवादक, कलाकार, डबिंग यासारख्या ठिकाणी हिंदी भाषेचे ज्ञान असलेल्यांना संधी उपलब्ध असल्याचे ते म्हणाले.

# जळगावात घरफोडी करणाऱ्यास पुण्यातून अटक; एलसीबीची कारवाई

प्रतिनिधी | जळगाव

**शनिपेठ पोलीस स्टेशन हद्दीत घरफोडी करणाऱ्या उल्हासनगर येथील एका संशयीतावर स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने कारवाई केली. त्याला हडपसर (पुणे) येथून ताब्यात घेवून शनीपेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.**

शहरात वाढत्या चोरीच्या घटना लक्षात घेवून गुन्हे उघडकीस आणण्याच्या सुचना जिल्हा पोलीस प्रशासनातर्फे देण्यात आल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांनी दोन स्वतंत्र पथके तयार करुन तपासाला सुरुवात केली होती.


पथकाने सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण करुन चंदन राजु सुनी (वय-४५, रा.सरदारपाडा वस्ती, उल्हासनगर-१) या निष्पन्न करुन त्यास रामटेकडी (हडपसर, पुणे) येथून ताब्यात घेतले. त्याची अधिक चौकशी केल्यानंतर त्याने त्याचा भाऊ कुलदीप राजु सुनी व त्याच्या दोन साथीदारांच्या मदतीने घरफोडी केल्याची कबुली दिली. त्याला पुढील कारवाईसाठी शनिपेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# ओमकार पार्क परिसरात रात्रीची पोलीस गस्त वाढवा

## ● नागरिकांचे रामानंदनगर पोलिसांकडे निवेदनाद्वारे मागणी; चोरीच्या घटनांमध्ये वाढ

प्रतिनिधी | जळगाव

**पिंप्राळा परिसरातील ओमकारपार्क परिसरात रात्रीच्यावेळी चोरट्यांचा वावर वाढला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून या भागात रात्रीची नियमित पोलीस गस्त वाढविण्यात यावी, अशी मागणी ओमकार पार्क येथील रहिवाशांनी केली आहे.**



या मागणीचे निवेदन नुकतेच रामानंदनगर पोलीस स्टेशनला देण्यात आले. निवेदनात, सोनीनगर परिसरात गेल्या महिन्यात दोन घरफोडीच्या घटना घडल्या असून यात चोरट्यांनी लाखोंचा ऐवज लंपास केला होता. त्यानंतर अलीकडे पुन्हा चोरीचा प्रयत्न झाला. मात्र, नागरिक जागे झाले झाल्याने चोरटे पसार झाले.

चोरट्यांची मजल वाढत चालल्याने सोनी नगर, ओमकार पार्क, बाबुराव नगर या परिसरांमध्ये रात्रीच्या वेळी रामानंदनगर पोलिसांची गस्त वाढविण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, पसार झालेले चोरटे हे ओमकार पार्क परिसरात पळाल्याचा संशय देखील नागरिकांनी व्यक्त केला आहे.

**उपाययोजना करण्यात यावी**

पोलिसांनी तातडीने उपाययोजना करून परिसरातील सुरक्षितता वाढवावी, अशी मागणी देखील ओमकारपार्कसह परिसरात नागरिकांनी केली आहे.

> “ काही हाकेच्या अंतरावर असलेल्या सोनीनगरात दोन घरफोडी तर मंदिरात दानपेटी चोरीची घटना घडली आहे. मात्र अद्याप चोरट्यांचा तपास लागला नाही. थंडीमुळे नागरिक घराच्या बाहेर फिरत नसल्याने याचा फायदा घेत परिसरात चोरीची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पोलिसांनी गस्त वाढवावी.
>
> **– दीपक देवरे, रहिवासी, ओमकार पार्क**

> “ पिंप्राळा शिवारातील गट नंबर २९२/२ ओमकार पार्क, सावखेडा रोड जवळील परिसरात रात्री चोरटे फिरत असल्याने कुत्रे भुकण्याच्या आवाज येत असतो. रात्री २.३० वाजेच्या सुमारास चोरटे जवळील जंगल भागातून येत असल्याचा संशय आहे. पोलिसांनी रात्रीची गस्त या भागात वाढवल्याने चोरट्यांना आळा बसणार आहे.
>
> **– विलास निकम, रहिवासी, ओमकार पार्क**

## पान १ वरुन


**टॅरिफची धमकी देणाऱ्या......**


की, तुम्ही आधी ठरलेल्या गोष्टींवर सहमत झालात, आता बदल का? लुटनिक यांनीही हे मान्य केले की, तेव्हा त्या गोष्टी ठरल्या होत्या, पण आता नाहीत. याच काळात अमेरिकेने इंडोनेशिया, फिलिपाइन्स आणि व्हिएतनाम यांच्याशी वेगवेगळे व्यापारी करार केले, ज्यामुळे भारताशी चर्चा अधिक गुंतागुंतीची झाली. मोदींनी फोन का केला नाही? – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रम्प यांना फोन न करण्यामागे एक सावध आणि रणनीतिक विचार असल्याचे मानले जात आहे. ट्रम्प यांचा आधीचा राजकीय रेकॉर्ड पाहता ते अनेकदा घाईघाईत निर्णय घेतात आणि नंतर त्यात बदल करतात. जपान आणि ब्रिटनसारख्या देशांना याचा प्रत्यक्ष अनुभव आला आहे. विश्लेषकांचे मत आहे की, मोदींनी ट्रम्प यांना अशी कोणतीही संधी देऊन त्यांना भारतावर दबाव टाकण्याची किंवा करारात एकतर्फी फायदे मिळवण्याची परिस्थिती निर्माण करायची नव्हती. फोन करून करार फायनल करण्याऐवजी भारताने आपली भूमिका अधिक मजबूत ठेवण्याचा प्रयत्न केला असावा, अशी चर्चा आहे.


**मुख्यमंत्री फडणवीसांकडून......**


जोडल्या असल्याचे शिंदे यांनी सांगितले. तक्रारीची प्राथमिक छाननी केल्यानंतर हे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पाठवण्यात आल्याचा दावा काँग्रेसने केला आहे. आयोगाने यासंदर्भात बीएमसी अधिकाऱ्यांना अधिकृत ईमेल पाठवला असून त्याची प्रत तक्रारदारालाही देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. काँग्रेसने या प्रकरणामुळे निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे म्हटले आहे.


**देवेंद्र फडणवीस अन्......**


नोंदवण्यात आली आहे, ज्यात फडणवीस यांना गोवण्याच्या रणनीतीवर चर्चा करण्यात आली होती. अहवालात म्हटले आहे की, जेव्हा संजय पुनामिया आणि सुनील जैन यांना कोपरी पोलिस स्टेशनमध्ये अटक करण्यात आले, तेव्हा ठाण्याचे तत्कालीन डीसीपी (गुन्हे) लक्ष्मीकांत पाटील यांनी यूएलसी घोटाळ्यासंबंधी त्यांची चौकशी केली. वास्तविक पाहता ते या चौकशीशी थेट जोडलेले नव्हते.


**रेल्वे अधिकाऱ्यांचा ‘काळा......**


विचार सोडून देऊन नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि भारतीय समाधानांवर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले. हा काळा सूट आतापर्यंत केवळ मोठ्या तपासणी मोहिमा, परेड आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विशेष प्रसंगी घातला जात असे. हा नवा नियम ग्रुप-डी कर्मचारी, ट्रॅकमन आणि तांत्रिक स्टाफवर लागू होणार नाही. रेल्वेमंत्र्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, कामाची पद्धत असो वा पेहराव, आपल्याला वसाहतवादी मानसिकता शोधून पूर्णपणे काढून टाकावी लागेल. भारतीय कंपन्या आणि त्यांनी विकसित केलेल्या उपायांवर आपल्याला विश्वास वाढवावा लागेल, तरच आपण देशात विकसित केलेले तंत्रज्ञान जगापर्यंत पोहोचवू शकू, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. .


**मुंबईत फ्रीजचा भीषण......**


बीएमसीच्या अधिकृत निवेदनाद्वारे मिळालेल्या माहितीनुसार, गोरेगाव पश्चिमेकडील भगतसिंगनगर येथील इमारतीमधील तळमजल्यावरील घरात आग लागली. फ्रीजचा मोठा स्फोट होऊन ही आग लागली. प्रथम ती आग प्रामुख्याने तळमजल्यावरील विद्युत वायरिंग आणि घरगुती वस्तूंपर्यंत मर्यादित होती, मात्र ती पसरली आणि पहिल्या मजल्यावरील एका खोलीतील तीन लोकांच्या कपड्यांना आग लागली. त्या घराचा नंबर अजून समोर आलेला नाही. पहाटेच्या सुमारास ही आग लागली तेव्हा सगळेच गाढ झोपेत होते. मात्र आग लागल्याचे समजताच इमारतीतील नागरिकांनी फायर ब्रिगेडला फोन केला. तसेच ते जवान घटनास्थळी पोहोचेपर्यंत स्थानिकांनी बादल्यांमधून पाणी ओतत आग विझविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर विजेचे कनेक्शन बंद करून फायर ब्रिगेडच्या जवानांनीही आगीवर नियंत्रण मिळवत ती पूर्णपणे विझविली. या आगीच्या ज्वाळांमुळे जखमी झालेल्या तिघांना अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढले आणि उपचारांसाठी ट्रामा केअर रुग्णालयात नेले. मात्र, तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.


**शक्तीपीठ महामार्ग राज्याच्या......**


महामार्गाच्या खर्चावरही शेट्टी यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. नाशिक-अक्कलकोट ३७४ किमी ग्रीनफिल्ड महामार्गासाठी केंद्राने १९,१४२ कोटी रुपये मंजूर केले असून प्रतिकिलोमीटर खर्च सुमारे ५१ कोटी रुपये आहे. मात्र ८०३ किमी लांबीच्या शक्तीपीठ महामार्गासाठी सुमारे १ लाख कोटी रुपयांचा प्रस्ताव असून प्रतिकिलोमीटर खर्च १२४ कोटी रुपयांहून अधिक कसा असू शकेल? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.


**‘पोक्सो’ कायद्यात येणार......**


ही चिंतेची बाब असून यामुळे अनेक होतकरू तरुणांचे आयुष्य जेलमध्ये वाया जात असल्याचे न्यायालयाने नमूद केले. या संदर्भात भाष्य करताना न्यायालयाने केंद्र सरकारला असे सूचित केले की, ज्या प्रकरणांमध्ये दोन्ही बाजू अल्पवयीन आहेत आणि त्यांचे संबंध परस्पर संमतीवर आधारित आहेत, तिथे कायद्याची कठोरता थोडी शिथिल व्हायला हवी. तसेच, जे लोक वैयक्तिक वैमनस्यातून किंवा बदल्याच्या भावनेतून या कायद्याचा गैरवापर करतात, त्यांच्यावरही कठोर कारवाई करण्याची तरतूद असायला हवी. अलाहाबाद उच्च न्यायालयाचा एक जुना आदेश रद्द करताना सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, वयाचा निकष हा खटल्याच्या सुनावणीचा भाग आहे, तो केवळ जामिनासाठी अनिवार्य करू नये.


**महिला सरपंचांच्या नावावर......**


असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कार्यशाळेत बोलताना त्यांनी ग्रामपंचायतींना महिलांसाठी स्वच्छ शौचालये, नळजोडणीद्वारे पाणीपुरवठा आणि सार्वजनिक ठिकाणी सुरक्षितता या बाबींना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले. या उपक्रमासाठी ३५ सूचकांकांचा एक विशेष डॅशबोर्ड देखील विकसित करण्यात आला असून, त्याद्वारे महिलांच्या आरोग्य, शिक्षण आणि सुरक्षिततेबाबतच्या कामाचे मूल्यमापन केले जाणार आहे. या कार्यक्रमाला राज्याच्या ग्रामीण विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, ‘यशदा’चे महासंचालक डॉ. निरंजन कुमार सुधांशू यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# झांबरे विद्यालयात बक्षीस वितरण समारंभ उत्साहात

प्रतिनिधी | जळगाव

**येथील ए.टी. झांबरे माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा वार्षिक बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देत त्यांच्या शैक्षणिक व नैतिक प्रगतीचा गौरव करणारा हा सोहळा विद्यालयाच्या गुणवत्तेची साक्ष देणारा ठरला.**



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे प्रशासकीय अधिकारी शशिकांत वडोदकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सोसायटीचे सचिव ॲड.प्रमोद पाटील, मुख्याध्यापिका सुजाता फालक, मुख्याध्यापिका अर्चना नेमाडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख निर्मल चतुर आदी उपस्थित होते. सोहळ्यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. दिगंबर पाटील यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल, महेंद्र नेमाडे व रत्नमाला शिंदे यांचा राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत चमकदार कामगिरी केल्याबद्दल तर निर्मल चतुर यांचा राज्यस्तरीय कथाकथन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल सन्मान करण्यात आला. तसेच करण भूषण पाटील, भूमिका गोपाळ चौधरी, सृष्टी विशाल कुलकर्णी, दामोदर धनंजय चौधरी, नूतन महेंद्र बारी (५ वी), शाश्वत विशाल कुलकर्णी (६ वी), गुंजन दिगंबर ढाके, हेमांगी निलेश सावळे (७ वी), संस्कृती जयवंत खैरनार, कृष्णा अजय बडगुजर (८ वी), करणभूषण पाटील व कुमारी भूमिका गोपाळ चौधरी (९ वी) या गुणवंत विद्यार्थ्यांचा देखील गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा जयकर व रत्नमाला शिंदे यांनी केले.

**■ तेव्हाच दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचते**

मुख्याध्यापिका प्रणिता झांबरे म्हणाल्या की, झांबरे विद्यालय हे केवळ ज्ञानाचे मंदिर नसून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ देणारे संस्कार केंद्र आहे. आजचा हा सोहळा म्हणजे वर्षभर विद्यार्थ्यांनी घेतलेले परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांनी दाखवलेला विश्वास यांचा गौरव आहे. शाळेचे प्रत्येक यश हे सामूहिक मेहनत आणि अभ्यासूवृत्तीचे फळ आहे. आमचे ध्येय केवळ परीक्षार्थी घडवणे नसून समाजाला सुजाण नागरिक देणे हे आहे. जेव्हा शिक्षक स्वतः प्रगत होतात, तेव्हाच खऱ्या अर्थाने दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचते, असे त्या म्हणाल्या.

# मातोश्री विद्यालयात योग शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी | जळगाव

येथील मातोश्री प्राथमिक विद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा योग विभाग व प्रबोधन संस्थेचे अध्यक्ष माजी आ.जयप्रकाश बाविस्कर यांच्या संयुक्त विद्यमाने एक महिन्याचे योग शिबीर आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे उदघाटन मुख्याध्यापक समाधान इंगळे यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी ठाकरे, शारदा मोहिते, वैशाली पाटील, कविता गावित, मिलिंद नाईक, प्रमोद झलवार यांच्यासह सर्व शिक्षक उपस्थित होते. शिबिरात शामकांत वडींकर मार्गदर्शन करीत आहे. उपक्रमास विद्यापीठाचे इंजि.प्रा. राजेश पाटील, डॉ.प्रा. लीना चौधरी, डॉ. गितांजली भंगाळे, प्रा. लिता चौधरी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

# साहित्य हे मानवाच्या विचारांची शाळा : डॉ.जयप्रकाश कर्दम

## ● विद्यापीठात पार पडले ‘साहित्यातील मानवतावाद’ विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

प्रतिनिधी | जळगाव

**साहित्यातून मानव कल्याणाची भावना विकसीत केली पाहिजे. साहित्य हे मानवाच्या विचारांची शाळा आहे, साहित्यातून मानव धडे घेत असतो, असे प्रतिपादन भारत सरकारच्या केंद्रीय हिंदी प्रशिक्षण संस्थेचे माजी संचालक तथा ज्येष्ठ साहित्यकार डॉ.जयप्रकाश कर्दम यांनी यांनी केले.**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास व संशोधन केंद्राच्यावतीने पी.एम. उषा कार्यक्रमांतर्गत ‘साहित्यातील मानवतावाद’ या विषयावर एकदिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राचे उद्घाटन शुक्रवार, दि.९ रोजी सकाळी १० वाजता पार पडले. याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार व नाट्यकर्मी ज्ञानेश महाराव, भाषा अभ्यास, प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा.म.सु. पगारे, आजीवन अध्ययन विस्तारविभागाचे संचालक प्रा.आशुतोष पाटील व समन्वयक डॉ.सुदर्शन भवरे आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ.कर्दम यांनी, समाजाने विभाजन, हिंसा, दबंगगिरी आदीबाबी पाहिल्या, साहित्याने मानवाला नेहमी मानवतावादाकडे नेण्यासाठी प्रेरीत केले. परंतु, मानवावर त्याचा खरच प्रभाव पडला आहे का? हे विचार करण्यासारखे आहे. मानवतावाद सर्वांना समानतेची वागणूक देण्यास सांगतो. त्याचे आचरण झाले पाहिजे, असे सांगितले. यावेळी कुलगुरू माहेश्वरी यांनी देखील मनोगत व्यक्त केले.या चर्चासत्रात २०० संशोधक विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

**माणसाने माणसांचा विचार करावा ■**

ज्येष्ठ पत्रकार ज्ञानेश महाराव म्हणाले की, माणसाने माणसांचाच विचार केला पाहिजे आणि माणसासारखे वागले पाहिजे. साहित्याने समाजाला जोडून ठेवता येईल असे साहित्य निर्माण केले पाहिजे. महात्मा फुले, संत तुकाराम, प्रबोधनकार ठाकरे या राष्ट्र पुरुषांनी मानवतावादाचा प्रसार व प्रचार केला. परंतु, समाज व्यवस्थेत अजूनही मानवतावाद पूर्णत: दिसत नाही. जातीभेद, धर्मभेद, वंशभेद आदिबाबी ईश्वरनिर्मित नाहीत. तर या मानवनिर्मितच आहेत, असे सांगून त्यांनी तरूणांनी मानवतावाद जोपासावा असे आवाहन केले.

**■ मानवाचे वर्तन विवेकपूर्ण असावे**

भाषा अभ्यास, प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा.म.सु. पगारे यांनी सांगितले की, या चर्चासत्रात साहित्यातील मानवतावाद या विषयावरील शोधनिबंधांचे मराठीतून खंड -१ व २, हिंदी भाषेतून खंड-१ व इंग्रजीभाषेतून खंड-१ व २ असे ५ खंड तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक माणसाने मानवतावाद जोपासला पाहिजे, मानवतावाद हा माणसांच्या जगण्याशी निगडीत आहे. मानवाचे वर्तन विवेकपूर्ण असावे. साहित्य हे माणसाला माणूस बनवणारे असावे, चांगली राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था घडविणारे असावे, असे ते म्हणाले.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (मोबा. – ७५८८१३१३२) (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# कैलास हजारे यांचा प्रदीर्घ अनुभव भाजपची ताकद बनेल

## पालकमंत्री रावल यांनी व्यक्त केला विश्वास : हजारेंचा समर्थकांसह भाजपात प्रवेश

प्रतिनिधी । धुळे

**राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ पदाधिकारी व धुळे नगरपालिका आणि महापालिकेत तीन वेळा नगरसेवक म्हणून काम करणाऱ्या कैलास हजारे यांना समाजकारणासह राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव आहे. हजारे यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला असून, त्यांचा हा प्रदीर्घ अनुभव भारतीय जनता पक्षाची ताकद बनेल, असा विश्वास राज्याचे पणन व राजशिष्टाचारमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कैलास हजारे यांनी शुक्रवारी (दि.९) आपल्या समर्थक कार्यकर्त्यांसह पालकमंत्री रावल यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. आमदार अनुपभय्या अग्रवाल यांच्या संपर्क कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात पालकमंत्री रावल यांनी त्यांच्यासह समर्थकांचे स्वागत केले, यावेळी ते बोलत होते.



यावेळी आ.अनुपभय्या अग्रवाल, भाजपचे महानगर जिल्हा सरचिटणीस ओमप्रकाश खंडेलवाल, सुनील कपिल, यशवंत येवलेकर, माजी नगरसेवक भगवान गवळी, कमलेश देवरे, प्रफुल्ल पाटील, संभाजी राजपूत, नितीन लिंगायत, अमित दुसाने आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना आमदार अग्रवाल म्हणाले की, धुळे महापालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या उमदेवारांना जनतेचा भरघोस पाठिंबा आणि प्रतिसाद लाभत आहे. पक्षाचे सर्वच नेते, पदाधिकारी ठिकठिकाणी कॉर्नर सभा घेऊन तसेच प्रचार फेरी काढून भाजपचा विकासाचा अजेंडा जनतेसमोर मांडत आहेत. गेल्या पाच वर्षांत केलेली विकासकामे आणि पुढील पाच वर्षांत केल्या जाणाऱ्या विकासकामांची मांडणी करत भारतीय जनता पक्ष जनतेसमोर जात आहे.

**श्री. हजारे म्हणाले, की पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भक्कम नेतृत्वात भारतीय जनता पक्ष राज्यासह देशाला प्रगतीच्या शिखरावर नेण्यासाठी प्रयत्नशील आहे. या कार्यात आता आम्हीही सामील होण्याचा निर्णय घेत आज पक्षात प्रवेश करत आहोत. येत्या १५ जानेवारीला होत असलेल्या महापालिका निवडणुकीत भाजपचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी आम्ही आमच्या परीने प्रयत्नशील राहू, जनतेत भाजपची ध्येयधोरणे पोहोचवून विकासाच्या मुद्यावर मते मागू, अशी ग्वाही दिली.**

यामुळे विरोधी पक्षांतील अनेक नेते, ज्येष्ठ पदाधिकारीही या विकासाला साथ देण्यासाठी भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. आज राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ माजी नगरसेवक कैलास हजारे आपल्या समर्थकांसह भाजपमध्ये आले. त्यांच्या या अनुभवाचा पक्षाला नक्कीच लाभ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# शिक्षकेत्तर महासंघाचे १ फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय अधिवेशन : महाले

प्रतिनिधी । तळोदा



**महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर महामंडळाचे ५३ वे राज्यस्तरीय अधिवेशन रविवारी (ता. १) फेब्रुवारी रोजी लोकमान्य बाळ गंगाधर चेंबूर, मुंबई येथे होणार आहे. या अधिवेशनाला नाशिक विभागातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नाशिक विभागीय कार्यवाह डी. पी. महाले यांनी केले.**

महामंडळाच्या राज्यव्यापी अधिवेशनामध्ये शिक्षकेतर बांधवांच्या प्रलंबित प्रश्नांवर विचारविनिमय, चर्चासत्र, परिसंवाद होणार असून यामध्ये अनेक तज्ञ विचारवंतांचे मार्गदर्शन होणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, शिक्षक आमदार विक्रम काळे, जयंत आसगावकर, पदवीधर आमदार निरंजन डावखरे, सत्यजित तांबे, ज्ञानेश्वर म्हात्रे उपस्थित राहणार आहेत. महामंडळाच्या राज्यव्यापी अधिवेशनासाठी राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती, आश्वसित प्रगती योजना पुर्वलक्षी प्रभावाने लागू करणे, अनुकंपा तत्वावरील पदांची नियुक्ती, जुनी पेन्शन योजना तसेच वैद्यकीय, रजा देयके असे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. यावर चर्चा आणि विचारविनिमय आणि संघटनेची पुढील ध्येय धोरणे ठरविली जाणार असल्याची माहिती महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर यांनी दिली आहे. सदर अधिवेशन महत्वपूर्ण असल्याने या अधिवेशनास नाशिक विभागातील नंदुरबार, धुळे, जळगाव व नाशिक जिल्ह्यातील शिक्षकेतर बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नाशिक विभागीय कार्यवाह डी. पी. महाले यांनी केले आहे.

## थोडक्यात

### प्रभातनगरजवळ गतिरोधक बसवा

**धुळे ।** शहरातील पांझरा नदीकाठावरील समांतर रस्त्यावर, प्रभातनगर येथील बीच कम बंधाऱ्याजवळ अपघाताचा धोका वाढला आहे. प्रभातनगरातील डीपी रोड, समांतर रस्ता आणि बंधाऱ्यावरील पूल या मार्गामुळे येथे एक धोकादायक चौफुली तयार झाली आहे. विशेषतः हत्तीदोहाकडून येणारी वाहने थेट प्रभातनगरकडे वेगाने वळण घेतात, ज्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. महापालिकेने तत्काळ प्रश्न सोडवावा अशी मागणी केली आहे.

### प्राथमिक शाळेत सुजाण पिढीची घडण : आ.भदाणे

**धुळे ।** प्राथमिक शाळेतून उद्याची सुजाण पिढी घडत असते. ग्रंथालय आणि क्रीडासंकुलाच्या माध्यमातून बुध्दीमान आणि आरोग्यवर्धक पिढींना चालना मिळते. शेती व ग्रामविकासातून समृध्दी साधावी, असे आवाहन आ. राम भदाणे यांनी केले. धुळे तालुक्यातील गरताड येथे विविध विकास कामांचे उद्घाटन तसेच काही कामांचा प्रारंभ आ. राम भदाणे यांच्या हस्ते झाला. यावेळी जि.प.च्या माजी माजी अध्यक्षा धरती देवरे, गरताडच्या सरपंच रुपाली पाटील, उपसरपंच रत्नाबाई भिल, माजी सभापती प्रा. अरविंद जाधव, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष भाऊसाहेब देसले, उपसभापती विद्याधर पाटील, डॉ. विजय पाटील, जि.प.चे माजी सदस्य आशुतोष पाटील, माजी अध्यक्ष सुधीर जाधव, तिखीचे सरपंच श्रीराम पाटील, बाबुळवाडीचे सरपंच रावसाहेब पाटील, वडजाईचे सरपंच धर्मेश पाटील, फागणेचे सरपंच नगराज पाटील आदी उपस्थित होते.

### श्रमसंस्कार शिबिराचा उत्साहात समारोप

**धुळे ।** तालुक्यातील नगाव येथील गंगामाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा सायने येथे उत्साहात समारोप झाला. सात दिवशीय शिबीरात प्रार्थना, ध्यानधारणा, योगासने, श्रमदान व पथनाट्य आदी उपक्रम राबविण्यात आले. प्रमुख पाहुणे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश पाटील होते. प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील अध्यक्षस्थानी होते. निवृत्त मुख्याध्यापक व्ही. बी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले, जिवनात ध्येय निश्चित करा. ध्येय साध्य करण्यासाठी अभ्यास, प्रयत्न व चिकाटी ठेवा. सामाजिक एकोप्यासाठीही प्रयत्न करा. कोणतेही काम वेळेवरच करा. महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. भावना पाटील यांनी सूत्रसंचुलन केले.

# घरोघरी जाऊन मतदारांना वोटर स्लीप देणे आवश्यक : आयुक्त कापडणीस

प्रतिनिधी । धुळे

**शहरातील ९०% मतदारांना 'वोटर स्लीप' येणाऱ्या ४ दिवसांमध्ये प्रत्येक नागरिकांच्या घरोघरी जाऊन देणे आवश्यक आहे. 'वोटर स्लीप' वाटप करीत असताना आपण आपले 'वोटर स्लीप' कोणत्याही राजकीय पक्षांच्या उमेदवारांकडे देऊ नये, अशा सूचना मनपा आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी नितीन कापडणीस यांनी दिल्या.**




महानगरपालिका निवडणूकीत मतदारांना आपले मतदान शहरातील कोणत्या ठिकाणी व कोणत्या बूथवर आहे, हे माहीत व्हावे तसेच मतदान सुलभपणे करता यावे, यासाठी 'वोटर स्लीप' घरोघरी वाटप करण्यासाठी कर्मचाऱ्यांची बैठक आयुक्त नितीन कापडणीस यांच्या उपस्थितीत पार पडली.

यामध्ये मालमत्ता विभागातील लिपिक तसेच आरोग्य विभागातील मुकादम व आशा वर्कर यांचे प्रभागनिहाय पथक तयार करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे 'वोटर स्लीप' वाटप करताना प्रत्येकाची नोंद ठेवणे आवश्यक आहे. तसेच कर्मचारी यांनी कोणत्याही प्रकारचे राजकीय भाष्य करू नये व कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे 'वोटर स्लीप' वाटप करताना आपले ओळखपत्र जवळ असणे आवश्यक आहे, अशा सुचनाही यावेळी देण्यात आल्या.

बैठकीला मुख्य स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक, मुकादम मालमत्ता लिपिक व आशावर्कर उपस्थित होते.



# जनगणना कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करा; समितीच्या बैठकीत सुचना

प्रतिनिधी । धुळे

**महानगरपालिका तसेच चार्जस्तरावर जनगणना कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, प्रभागनिहाय व चार्जनिहाय क्षेत्ररचना, घरगणना व झोपडपट्टी गणना ब्लॉक्स याबाबतची माहिती अचूक व अद्ययावत ठेवावी, अशा सुचना महानगरपालिकास्तरीय समितीच्या आढावा बैठकीत देण्यात आल्या.**



जनगणना-२०२७ कार्यक्रमाच्या अनुषंगाने धुळे महानगरपालिकास्तरावर करण्यात येणाऱ्या जनगणना पूर्वतयारीच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी महानगरपालिकास्तरीय समितीची पहिली बैठक शनिवार, दि.१० रोजी मनपा आयुक्त नितीन कापडणीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीला अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उपआयुक्त स्वालिहा मालगावे, नगररचना सहसंचालक भटू पवार, प्रभारी जनगणना अधिकारी राजेंद्र माईनकर, सागर जकातदार, कल्पना जाधव, किशोर वाघ उप अभियंता प्रकाश सोनवणे, कमलेश सोनवणे अधिक्षक मुकुंद अग्रवाल, संजय मोरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जनगणना-२०२७ च्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय, तांत्रिक व क्षेत्रीय पातळीवरील पूर्वतयारीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या सूचनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

यावेळी आयुक्त कापडणीस यांनी, महानगरपालिका तसेच चार्जस्तरावर जनगणना कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात यावी, प्रभागनिहाय व चार्जनिहाय क्षेत्ररचना, घरगणना व झोपडपट्टी गणना ब्लॉक्स याबाबतची माहिती अचूक व अद्ययावत ठेवण्यात यावी, जनगणनेसाठी आवश्यक असलेल्या गणनाकर्मी, पर्यवेक्षक, क्षेत्र प्रशिक्षक व इतर कर्मचारी यांची माहिती संकलित करून सुसूत्र डेटाबेस तयार करणे, आगामी प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी आवश्यक ठिकाणे, सुविधा व मनुष्यबळ यांची पूर्वतयारी करणे आदी सुचना दिल्या.

जनगणना-२०२७ च्या कामकाजासाठी धुळे महानगरपालिका क्षेत्रात चार क्षेत्रिय कार्यालये स्थापन करण्यात आले असून, ती कार्यालये कार्यान्वित करण्यात आली आहेत. याकरिता ४ सहाय्यक आयुक्त यांची प्रभारी जनगणना अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. यामुळे क्षेत्रीय स्तरावर समन्वय राखणे व जनगणनेची कामे प्रभावीपणे राबविणे सुलभ होणार आहे, अशी माहितीही यावेळी देण्यात आली.

आयुक्त कापडणीस यांनी, सर्व संबंधित अधिकाऱ्यांना जनगणना-२०२७ च्या वेळापत्रकानुसार कामकाज पूर्ण करण्याबाबत तसेच दरमहा आढावा बैठक घेऊन कामकाजाची प्रगती तपासण्यात येईल, असे निर्देश दिले. जनगणना-२०२७ ही भारतातील पहिली पूर्णपणे डिजिटल जनगणना असल्याने, तांत्रिक सज्जता, अचूक माहिती संकलन व वेळेवर अहवाल सादर करणे याबाबत विशेष दक्षता घेण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

# धुळे भाजपकडून अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर

प्रतिनिधी । धुळे

**महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने आघाडी घेतली असून चार उमेदवार बिनविरोध झाले आहेत. उर्वरित उमेदवारांकडून प्रचाराला वेग देण्यात आला असून भाजपातर्फे प्रभागनिहाय उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे.**

प्रभाग क्र. १ 'अ' मध्ये रिंगणात उतरलेल्या उज्वला रणजित भोसले यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. तर 'ब'मधून योगिता संजय कुटे,'क'मधून ललित गंगाधर माळी, 'ड'मधून जगताप सुभाष सुकलाल, प्रभाग क्र. २ 'अ'मधून कविता शरद सोनवणे, 'ब'मधून डॉ. निशा सुशिलकुमार महाजन, 'क'मधून प्रभावती विलास शिंदे, 'ड'मधून सुनील (नंदुभाऊ) वसंतराव सोनार, प्रभाग क्र.३ 'अ'मधून शोभा संजय भिल, 'ब'मधून मिनल आकाश परदेशी (माळी), 'क'मधून युवराज (सनी) लक्ष्मण चौधरी, 'ड'मधून देवादादा चंद्रकांत सोनार, प्रभाग क्र.४ 'अ'मधून वैष्णवी हेमंत गिते (लोणारी), 'ब'मधून संगिता मोहन लोंढे, 'क'मधून रमेश शंकर करनकाळ, प्रभाग क्र. ५ 'अ'मधून नागसेन दामोदर बोरसे,'ब'मधून प्रतिभा शिवाजीराव चौधरी, 'क'मधून संध्या सागर कदम, 'ड'मधून कृपेश लक्ष्मण नांद्रे, प्रभाग क्र. ६ 'अ'मधून भगवान शंकर गवळी, 'ब' ज्योत्सना प्रफ्फुल पाटील (बिनविरोध), 'क'मधून वैभवी अमित दुसाने,'ड'मधून कमलेश नारायण देवरे, प्रभाग क्र. ७ 'अ'मधून वंदना संजय भामरे, 'ब'मधून रंगनाथ रतन ठाकरे, 'क'मधून रूपाली जगदिश पाटील, 'ड'मधून विजय अरूण देवरे, प्रभाग क्र. ८ 'अ'मधून योगेश यशवंत ईशी, 'ब'मधून प्रियंका खंडू बोरसे, 'क'मधून उज्वला अनिल ठाकरे, 'ड'मधून निलेश चंद्रकांत नेमाणे, प्रभाग क्र. ९ 'अ'मधून पूनम जितेंद्र शिरसाठ, 'ब'मधून प्रदिप पूरनदास बैरागी, 'क'मधून लताबाई यशवंत सोनार, 'ड'मधून जाधव संजय सुधाकर, प्रभाग क्र. १० 'अ'मधून सुनिल तुळशीराम बैसाणे, 'ब'मधून प्रतिभा अनिल पाटील, 'क'मधून किरण राकेश कुलेवार, 'ड'मधून अरूजा ललिता विरभान, प्रभाग क्र. ११ 'अ'मधून रोहित भानुदास चांदोडे, 'ब'मधून मायादेवी महादेव परदेशी, 'क'मधून कल्पना सुनिल महाले, 'ड'मधून चेतन संजय गवळी, प्रभाग क्र. १२ 'अ' मधून प्रतिक प्रदीप (नाना) कर्पे, 'ब'मधून अहिरराव जयश्री कमलाकर,'क'मधून शितल राहुल वाघ (पाटील), 'ड'मधून विक्रम फकीरा थोरात, प्रभाग क्र. १३ 'अ' मधून प्रमोद (आप्पा) धोंडू चौधरी, 'ब'मधून पुजा मांगीलाल सरग, 'क'मधून सोनाली विक्रम गोयर , 'ड'मधून दिलीप मोतीराम साळवे, प्रभाग क्र. १६ 'अ'मधून धिरज रामेश्वर परदेशी, 'ब'मधून कल्याणी सतीष अंपळकर , 'क'मधून पुष्पा राजेश पवार, 'ड'मधून आकाश विनायक शिंदे, प्रभाग क्र. १७ 'अ'मधून अमोल पावबा मासुळे (बिनविरोध), 'ब'मधून सुरेखा चंद्रकांत उगले (बिनविरोध), 'क'मधून सुनंदा प्रकाश (आबा) माळी, 'ड'मधून इंजि. शीतलकुमार मोहन नवले तर प्रभाग क्र. १८ 'अ'मधून चित्रलेखा विकी परदेशीर, 'ब'मधून रोहिणी विलास सोनवणे,'क'मधून सारिका प्रविण अग्रवाल आदी उमेदवार रिंगणात आहेत.

# आनंद मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । शिरपूर

तालुक्यातील अहिल्यापूर येथील आर. सी. पटेल प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला विद्यार्थ्यांसह पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे व्हाईस चेअरमन संग्रामसिंग राजपूत हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून वि.का.सोचे चेअरमन प्रेमसिंग राजपूत, सदस्य एकनाथ राजपूत, ग्रामपंचायत सदस्य साळुंखाबाई पाटील, पालक प्रतिनिधी प्रवीणसिंग राजपूत, मुख्याध्यापक विवेकानंद ठाकरे, मुख्याध्यापक प्रशांत लोहार उपस्थित होते.

# तळोदा शासकीय विश्रामगृह येथे रस्ता सुरक्षा सप्ताहनिमित्त कार्यक्रम

## नवीन वाहन परवाना धारकांना मार्गदर्शन व नेत्र तपासणी शिबिर

प्रतिनिधी । तळोदा

शासकीय विश्रामगृह येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय नंदूरबार यांच्यामार्फत दरमहा कच्चे व पक्के वाहन चालक परवाना देनेकामी शिबिराचे महिन्यातून दोन दिवस शिबिराचे आयोजन करण्यात येत असते. सध्या सुरू असलेल्या रस्ता सुरक्षा सप्ताह दि.१ जानेवारी ते २९ जानेवारीपर्यंत प्रादेशिक परिवहन अधिकारी उत्तमराव जाधव साहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल नलावडे, अक्षय येवले यांच्या मार्गदर्शनात मोटार वाहन निरीक्षक रोहीत पवार, मोटर वाहान निरीक्षक दिव्वेश उबाळे सहायक मोटर वाहन निरीक्षक गिरीश पाटील, अमित तळवी, मनोहर गांगुर्डे यांनी तळोदा शासकीय विश्रामगृह येथे येणाऱ्या सर्व नवीन वाहन परवाना धारकांना वाहन चालवणे विषयी मार्गदर्शन केले.



या प्रसंगी मोटार वाहन निरीक्षक रोहीत पवार, मार्गदर्शन करताना सांगितले की मोटासायकलस्वार चालवताना नेहमी हेल्मेटचा वापर करावा. व चारचाकी वाहन चालवते वेळी सीटबेल्टचा वापर करावा. पुढे मोटार वाहन निरीक्षक दीव्वेश उबाळे म्हणाले कि, वाहन चालवताना नेहमी डाव्या बाजुने वाहन चालवावे. मद्य पिऊन वाहन चालू नये. प्रसंगी अपघात होण्याची दाट शक्यता असते. तसेच शिबिरात कार्यालयामार्फत सर्व नवीन वाहन परवाना धारकांना मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक गिरीश पाटील, अमित तडवी, मनोहर गांगुर्डे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# सोशल मीडियावर प्रचारासाठी निवडणूक आयोगाकडून मंजुरी आवश्यक

प्रतिनिधी । धुळे

**महापालिका निवडणुकीसाठी प्रचाराचा जोर आता चांगलाच वाढला आहे. मतदारांच्या घरोघरी जाण्याबरोबरच समाज माध्यमांवरही उमेदवार आणि कार्यकर्त्यांकडून प्रचार केला जात आहे.**

मतदारांना प्रलोभन दाखविणारे, भडकविणारे भावना तसेच आचारसंहिता भंग होईल, असे कृत्य करणाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी पोलिसांच्या पथकाची नेमणूक केली आहे. विशेष प्रत्येक प्रभागातील पोलिस मित्र उमेदवारांच्या आणि पक्षांच्या सोशल ॲक्टीव्हीटीवर बारीक लक्ष ठेवून आहे.

**...तर कारवाई होणार**

उमेदवार व त्यांच्या कार्यकर्त्यांना सोशल मीडियावर प्रचारासाठी निवडणूक आयोगाकडून मंजुरी आवश्यक आहे. उमेदवारांना प्रचारासाठी सोशल मीडियावर टाकण्यात येणाऱ्या ध्वनिफीत व चित्रफितीसाठी निवडणूक आयोगाकडून परवानगी घ्यावी लागणार आहे. समाज माध्यमातून उमेदवारांच्या जाहिराती अथवा इतर मजकूर प्रसिद्ध करताना परवानगी बंधनकारक आहे. परवानगी न घेता प्रचार करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.

# राजकीय प्रचारात शिक्षकांची उडी

## चेअरमनच्या दबावामुळे शिक्षकांची कोंडी; अशोक लाडवंजारी यांचा आरोप

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील जय दुर्गा शाळा, राज शाळा येथील काही शिक्षक महापालिका निवडणुकीच्या प्रचारात गुंतले असून चेअरमन सुनील महाजन यांच्या दबावामुळे या शिक्षकांची गळचेपी सुरू आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होतं असून अशा शिक्षकांवर कारवाई करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अशोक लाडवंजारी यांनी केली आहे.**



महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू असल्याने गेल्या पंधरा-वीस दिवसापासून जळगाव शहरातील जय दुर्गा शाळा येथील काही शिक्षक चेअरमन सुनील महाजन यांच्या संस्थेत कार्यरत असून त्यांनी या महापालिका निवडणुकीत प्रचारापासून ते पत्रक वाटण्याचे काम सुरू केलेले आहे.

जयश्री महाजन, सुनील महाजन हे प्रभात १४ मधून निवडणूक लढवत आहे. महाजन दांपत्याची जयदुर्गा माध्यमिक विद्यालय आणि राज माध्यमिक विद्यालय नावाच्या शैक्षणिक संस्था आहेत. या विद्यालयातील शिक्षकांची पालिका अथवा निवडणूक अधिकाऱ्यांकडून ब्युरो ची नियुक्ती झालेली नाही. परंतु संस्थाचालक महाजन दांपत्य यांच्या दबावाखाली या संस्थेतील चार ते पाच शिक्षक राजकीय पक्षाचे काम करत आहे. विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडून, विद्यार्थ्यांचे नुकसान करून मागील एक महिन्यापासून हे शिक्षक महाजन दांपत्याचा प्रभागांमध्ये प्रचार करत आहेत. या संदर्भात आम्ही निवडणूक अधिकाऱ्याकडे व शिक्षण अधिकाऱ्याकडे तक्रार करून आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी शिक्षकांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# खडकेसिम विद्यालयात स्वागत, वार्षीक स्नेहसंमेलन उत्साहात

प्रतिनिधी । एरंडोल

**तालुक्यातील खडकेसिम येथील महेंद्रसिंह धर्मसिंह पाटील माध्यमिक विद्यालयात नवीन वर्षाचे स्वागत आणि वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात झाला. इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या तब्बल ५२ विविध गुणदर्शन कार्यक्रमांनी पालकांसह ग्रामस्थांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान विद्यालयाचे चेअरमन जगदीश पाटील यांनी भूषविले.**

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून परिसरातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर यशवंतराव चव्हाण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अमित पाटील, शिवसेना गटनेते व युवासेना जिल्हाप्रमुख प्रा. मनोज पाटील, माजी जि.प. उपाध्यक्ष ज्ञानेश्वर आमले, शिवसेना तालुकाध्यक्ष रविंद्र जाधव, सरपंच उत्राण, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष भागवत पाटील, माजी सरपंच खडकेसिम राखी जगदीश पाटील, माजी सरपंच खडके खुर्द सायली स्वप्नील पाटील यासोबतच बबलू चौधरी, दीपक, मोनू राजपूत, काँग्रेस यशवंत तळई, आबा राजपूत, अनिल किसान पाटील, विलास पाटील यांची उपस्थिती होती.

सहभाग विद्याध्यर्थ्यांनी मोठ्या उत्साहाने या स्नेहसंमेलनात नोंदवला. यावेळी विद्यार्थ्यांनी एकूण ५२ विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. ज्यात नृत्य, नाटक आणि इतर कलागुणांचे सादरीकरण करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासासोबतच कलेची जोड असणे आवश्यक आहे. आजच्या सादरीकरणातून मुलांनी त्यांचा आत्मविश्वास सिद्ध केला आहे, असे कौतुकाचे उद्गार मुख्याध्यापक राजेंद्र पाटील यांनी यांनी व्यक्त केले.

हा सोहळा यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात

### अंजनसोंडे येथे पोलीस पाटीलपद दोन वर्षांपासून रिक्त

**भुसावळ ।** तालुक्यातील अंजनसोंडे गावातील पोलिस पाटीलपद गेल्या दोन वर्षांपासून रिक्त असल्याने गावातील प्रशासकीय आणि कायदा-सुव्यवस्थेच्या समस्या दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. येथील पोलिस पाटील राजेंद्र भास्कर चौधरी यांचे निधन झाल्यानंतर हे पद अद्यापही रिक्तच आहे. पोलिस पाटील हे गाव पातळीवरील प्रशासनाचे महत्त्वाचे प्रतिनिधी असून ते नागरिक आणि पोलीस प्रशासन यांच्यातील मुख्य दुवा असतात. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून या पदाची नियुक्ती न झाल्याने आंजनसोंडे गावात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. पोलिस पाटील नसल्यामुळे नागरिकांना लहानसहान कामांसाठी थेट पोलीस ठाणे किंवा तहसील कार्यालयात धाव घ्यावी लागत आहे.

### इंदिरा गांधी विद्यालयात पोलीस स्थापना दिवस साजरा

**भुसावळ ।** भुसावळ तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील साकेगाव येथील इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय येथे पोलीस स्थापना दिवस साजरा करण्यात आले. प्रथम गावातुन जनजागृती रॅली काढण्यात आली. जनजागृती रॅली ही इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय येथून सुरू झाली व आंबेडकर नगर, पटेलगल्ली, ग्रामपंचायत, वाघोदे गल्ली व परत शाळेत संपन्न झाली. रॅलीमध्ये शाळेतील १०० ते १२० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. नंतर शाळेतील छोटेखानी कार्यक्रमात पोउनि पूजा अंधारे यांनी इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय साकेगाव येथे विद्यार्थ्यांना सायबर सेक्युरिटी, वाहतुकीचे नियम, गुड टच बॅड टच व सद्या सुरू असलेल्या सायबर क्राईम बद्दल, पोलीस काका व पोलीस दीदी संकल्पना बाबत माहिती दिली. कार्यक्रमास पोउनि पूजा अंधारे, शिक्षक श्रीमती नेमाडे, जगदीश भोई, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# दै.शौर्य मराठीच्या विभागीय संपादकपदी महेश शिरसाठ

प्रतिनिधी । चोपडा



**अल्पावधीतच वाचकांच्या पसंतीस उतरलेल्या व महाराष्ट्राचे निडर दैनिक म्हणून ओखळल्या जाणाऱ्या दै. शौर्य मराठीच्या विभागीय संपादकपदी जेष्ठ पत्रकार महेश पांडुरंग शिरसाठ यांची आज रोजी नियुक्ती करण्यात आलेली आहे.**

शिरसाठ हे गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी अनेक मोठ्या दैनिकांमध्ये प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधीसह उपसंपादक म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. एक धडाडीचे आणि निर्भीड पत्रकार म्हणून त्यांची ओळख आहे. पत्रकारितेसोबतच त्यांना समाजसेवेची आवड असल्याने त्यांचा सर्वत्र दांडगा जनसंपर्क असून सामाजिक, राजकीय, शैक्षणिकसह विविध विषयांवर लिखाणात त्यांचा हातखंडा आहे.

# राष्ट्रीय युवा दिना निमित्ताने ४८ रक्तदात्यांनी केले रक्तदान

प्रतिनिधी । फैजपूर



येथील ऐतिहासिक भूमीत वै. नथ्थूसिंग बाबा राजपूत दौरा मंडळाच्या वतीने आयोजित सामूहिक तुळसी अर्चन, विठ्ठल नामजप, श्रीसंगीत रामायण कथा व नामसंकीर्तन महोत्सवांतर्गत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

दि.९ जानेवारी, स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त साजऱ्या होणारा राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून हे शिबिर घेण्यात आले. या उपक्रमात युवकांसह भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला असून सुमारे ४८ रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेचा आदर्श ठेवला. रक्त संकलनाचे कार्य वै. जगन्नाथ महाराज अंजाळेकर संजीवनी ब्लड सेंटर, फैजपूर यांच्या सहकार्याने पार पडले. यावेळी डॉ. प्रशांत सोनवणे, नितीन इंगळे, कांचन नेहते, विशाल छपरीबंद, रोहिणी रुले, भारती महाजन व संगीता इंगळे यांनी वैद्यकीय सेवा दिली. या रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी चिन्मय वाघुळदे, भूषण नारखेडे, मयूर नारखेडे, राजू महाजन सर, रोहन सराफ, राहुल साळी, शेखर चौधरी, विशाल वर्मा, राहुल वर्मा, रजेंद्र मानेकर आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. यावेळी बोलताना ह.भ.प. नरेंद्र नारखेडे यांनी रक्तदान हे श्रेष्ठ दान असून एका रक्तदात्यामुळे अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचू शकतात. रक्तदानातून सामाजिक बांधिलकी जपली जाते आणि मानवतेचा खरा धर्म साधला जातो. प्रत्येक सक्षम व्यक्तीने पुढे येऊन रक्तदान करावे, असे आवाहन केले.

# शिरूड येथे शालेय क्रीडा महोत्सव स्पर्धेचे उद्घाटन

प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील रुड येथील व्ही.झेड. पाटील हायस्कुल ये तीन दिवसीय क्रीडा महोत्सव ायोजन करण्यात आले होते.**

डास्पर्धाचे उद्घाटन उपसरपंच वसंत गवान पाटील (शालेय समिती सदस्य), मुख पाहुणे एस.पी. वाघ (क्रीडा तालुका मुख) यांच्या हस्ते करण्यात आले. वेळी वाघ यांनी खेळाडू कसा घडला हिजे, खेळाबद्दल जिद्द, चिकाटी व पेच गरीब घरातून राष्ट्रीय खेळाडू कसे नले कल्पना राऊत यांच्या जीवन माहिती गितली चीनमधील गुआंगजऊ येथे बलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत दहा जार मीटर धावण्यात कविताचे स्वर्णपदक अवघ्या सेकंदाने हुकले; पण बाप्रसंगी कविताची समजूत तिच्या आईने पढली. आईच्या शब्दांनी कविताला लासा मिळाला. दुर्गम भागातील रस्ते, पाण्यासाठी वणवण करणे, हा रोजचा दिवस. अशा प्रतिकूल परिस्थितीत कुरकुर न करता, हार न मानता जीवन जगणे म्हणजे एक दिव्यच! अशी खेडाळू कल्पना राऊत यांचे बद्दल माहिती सांगितली असे विविध मुद्यावर स्पर्धेबाबत विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे यांनी आपल्या मनोगतातून सांगितले, तसेच अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, मुख्याध्यापक, विद्यार्थी आणि विद्यार्थीनीनी मशाल पेटवून स्पर्धना सुरवात करण्यात आली. क्रीडा स्पर्धेत खो-खो, क्रिकेट, १०० मी. धावणे, लिंबू चमचा शर्यत, गोणपाट शर्यत, स्लो सकलिंग, रिले शर्यत आदी खेळांचा समावेश होता. शाळेतील पाचवी ते दहावीच्या वर्गातील विद्यार्थी क्रीडास्पर्धेत उत्स्फुर्तपणे सहभागी झालेत. स्पर्धा यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक अनिल शिवाजी पाटील व शिक्षक कर्मचाऱ्याऱ्यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन गुलाब बोरसे यांनी केले.

# राज्य पत्रकार संघाच्यावतीने विद्यार्थ्यांना शालेय कीटवाटप

प्रतिनिधी । पाचोरा

**राज्य पत्रकार संघाच्या वतीने बाळशास्त्री जांभेकर जयंती निमित्ताने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या सन्मानित सोहळ्याच्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पाचोरा, भडगाव तालुक्यातील विविध दैनिकात कार्यरत जेष्ठ पत्रकार यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यानंतर विद्याथ्यर्थ्यांना शालेय कीट वाटप करण्यात आले.**

पाचोऱ्याचे लोकनियुक्त नगराध्यक्षा सुनीता पाटील व प्रमुख पाहुणे म्हणून भडगावचे लोकनियुक्त नगराध्यक्षा रेखा मालचे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले, प्रमुख अतिथी किशोर रायसाकडा (राज्य प्रदेश) उपाध्यक्ष, राकेश सुतार, (विभागीय उपाध्यक्ष), तालुकाध्यक्ष रतिलाल पाटील, पत्रकार हल्लाकृती समिती प्रल्हाद पवार, जिल्हा उपाध्यक्ष मनीष सोनवणे यांच्या हस्ते कै. यादव दगडू पाटील माध्यमिक विद्यालय तांदुळवाडी येथील आदिवासी वस्तीगृहातील विद्याथ्यर्थ्यांना शालेय किट वाटप करण्यात आले. याप्रसंगी सरपंच दादाभाऊ वेडू पाटील, जयवंतराव पाटील, समाजसेवक अमोल जाधव, भाऊसाहेब पाटील, माजी सरपंच सूर्यकांत पाटील यांनी भडगाव व पाचोरा पत्रकारांचा सत्कार करून गौरवण्यात आले.

# राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत पिंपळे येथील खेळाडू ठरले धुरंधर

प्रतिनिधी । अमळनेर

**आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक अंतर्गत येणाऱ्या आदिवासी विकास विभाग, अमरावती यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत अमळनेर तालुक्यातील पिंपळे आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी १०० मीटर धावणे, लांब उडी, थाळी फेक आणि ४०० मीटर धावणे स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले आहे. क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन या स्पर्धांचे उद्घाटन विजय वाघमारे (सचिव, आदिवासी विकास, महाराष्ट्र) यांच्या हस्ते करण्यात आले.**



यावेळी डॉ. श्वेता सिंघल (विभागीय आयुक्त, अमरावती विभाग), तसेच पवनश्री प्रभावकर वैद्य, (प्रधान सचिव, श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ) विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमास रविंद्र ठाकरे, (आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती,) आशीष पाटील, (जिल्हाधिकारी, अमरावती), राकेश ओला ( पोलीस आयुक्त अमरावती), सोनिया शर्मा चांडक (आयुक्त, मनपा, अमरावती), तसेच लिना बनसोड (आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक), आयुषी सिंह (अप्पर आयुक्त, अमरावती)उपस्थित होते. या ा स्पर्धांमध्ये नाशिक, अमरावती, ठाणे व नागपूर या चार विभागातील खेळाडू सहभागी झालेले होते. या स्पर्धेत अनुदानित आदिवासी आदर्श आश्रमशाळा पिंपळे बु. येथील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. वासुदेव भिमसिंग पावरा (१९ वर्ष वयोगट) याने दुहेरी मुकुट मिळवत १०० मीटर धावणे व लांब उडी या दोन्ही खेळ प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून गोल्ड मेडल प्राप्त केले. रोशनी लक्ष्मण पावरा (१८ वर्ष वयोगट) हिने थाळी फेक या क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक, तर राजकिरण अमाश्या पावरा (१४ वर्ष वयोगट) याने ४०० मीटर धावणे या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले.

# पाचोरा-भडगाव ग्राहक सेवा संघाच्या अध्यक्षपदी ललिता पाटील

प्रतिनिधी । पाचोरा

**येथील ग्राहक सेवा संघ पाचोरा-भडगावचा सेवाभावी स्वयंसेवी ग्राहकांच्या हितासाठी कार्य करणाऱ्या संस्थेची वार्षिक मीटिंग नुकतीच सु.भा. पाटील विद्यामंदिर येथे संपन्न झाली. सभेच्या अध्यक्ष मीना बाग होत्या. प्रास्ताविक ग्राहक सेवा संघाचे सरचिटणीस आनंद नवगिरे यांनी केले.**



प्रस्ताविकेत आनंद नवगिरे यांनी २०२५ या वर्षभरात संघटनेने केलेल्या कामांचा अहवाल सादर केला. रेल्वे विभाग, वीज महावितरण मंडळ, मोकाट व भटक्या कुत्र्याच्या बंदोबस्ताबाबत पाचोरा नगरपालिकेला भडगाव नगरपरिषदेला वेळोवेळी पाठवलेली निवेदने व वर्षभरात ग्राहकांच्या आलेल्या समस्या सोडवण्याचा सविस्तर अहवाल सादर केला. संघटनेचे कार्याध्यक्ष आर.पी. बागुल यांनी रेल्वे ग्राहक व प्रवासींबाबत महत्त्वपूर्ण माहिती सांगितली. संघटनेने पाठपुरावा करीत असलेल्या रेल्वेच्या अनेक समस्या सुटल्या आहेत. काही सुटण्याच्या मार्गावर आहेत.

संघटनेच्या सदस्य प्राजक्ता अतुल देशमुख यांना रसायनशास्त्रात एच.डी. डॉक्टरेट मिळाल्याबद्दल त्यांचा मीना बाग यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात मीना बाग यांनी संघटना ग्राहकांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करीत आहे अध्यक्ष पदाची संधी मिळाल्याबद्दल संघटनेचे आभार मानले. मीटिंगमध्ये सर्वानुमत ललिता कृष्णराज पाटील यांचे नाव ग्राहक सेवा संघाच्या अध्यक्षपदासाठी जाहीर करण्यात आले. ललिता पाटील यांची संघटनेच्या अध्यक्षपदासाठी निवड झाल्याबद्दल मीना बाग यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला संघटनेचे अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ललिता पाटील यांनी संघटनेचे आभार मानले.

संघटनेचे कार्य मी पुढे नेईल असे आश्वासन ललिता पाटील यांनी दिले. सभेचे सुत्रसंचालन राधा शर्मा यांनी केले. या वार्षिक सभेला ग्राहक सेवा संघाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थापक प्राचार्य डी एफ पाटील, प्राध्यापक एलबी शर्मा, व्ही टी जोशी, कैलास अहिरे, डॉ भरतकुमार प्रजापत, राजेश धनुराडे, खलील शेख, संजय कोतकर, सुखदेव गीते, जगदीश खेलोसिया, एकनाथ सदनशिव, जनार्दन महाजन, राधेश्याम दायमा रवींद्र सोनवणे, शीला पाटील, विद्या कोतकर उज्वला देशमुख, मिर्झा अश्फाक, मितेंद्र शर्मा, श्वेता शर्मा, शमा शर्मा, सुनंदा महाजन नैना कापुरे, रंजना पुजारी, वैशाली जडे, लता परदेशी, कविता महाजन, माला पंजाबी, कल्पना देसले, कमल कोळी, लिना राजपूत, अनिता दायमा, सुरेखा वाघ, कामिनी पाटील, संगीता जळतकर, सरिता पाटील, रेखा महाजन, उषा सदानशिव, रेखा पाटील आदी मोठ्या संख्येने हजर होते.

# तालुक्यात अधिक थंडीमुळे रब्बीची पिके जोमात

## मका पिकावर अळिंचा प्रादुर्भाव; परिसरात भुईमूगचा पेरा झाला कमी

प्रतिनिधी । धरणगांव

**धरणगांव शिवारासह तालुक्यातील आनोरे, धानोरे, गारखेडे पिंप्री, वाघळूद परिसरात यावर्षी पाऊस समाधानकारक झाला असल्याने रब्बी ची पिके बहरू लागली आहेत.**

पाटाचे आवर्तन सुरू झाले असल्याने मका, गहू, हरभरा पिकाची लागवड व पेरणी अधिक प्रमाणात झालेली आहे. कोरडवाहू शेतीसाठी पाटाचे आवर्तन नवसंजीवनी ठरत आहे. त्यामुळे शेकडो हेक्टर जमीन सिंचनासाठी उपयुक्त ठरत आहे. मका तसेच गव्हाची कोळपणी होत असून रब्बीची पिके डोलू लागली आहेत. तसेच अधिक प्रमाणात थंडी पडते असल्याने ही थंडी गव्हासाठी फायदेशीर ठरत आहे. मका पिकावर अळिंचा प्रादुर्भाव दिसून येत असल्याने मकावर फवारणी मारण्यात शेतकरी व्यस्त आहे.

दरम्यान, तणनाशकचा उपयोग जास्त प्रमाणात होत असल्याने महिला मजुरांना देखील पाहिजे त्या प्रमाणात कामे मिळत नसल्याचे बोलले जात आहे. यावर्षी तालुक्यात मकाचा पेरा अधिक आहे. मजुरी अधिक लागत असल्याने भुईमूगचा पेरा कमी झालेला आहे. सकाळी दहा वाजेपर्यंत दवबिंदू (ओस) पडत असल्याने त्याचा फायदा गहू व हरभरा पिकाला होत आहे. लवकर लावलेला मका निसवणीला येत असून



फुलोरा व फळधारणेला सुरूवात झालेली आहे. रब्बीच्या पिकाला यावर्षी अधिक भाव मिळेल, अशी आशा बळीराजाला लागून आहे.



# भडगाव येथे परिवहन कार्यालयातर्फे रस्ता सुरक्षा अभियान

प्रतिनिधी । भडगाव

**येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी भडगाव यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा बाबत जनजागृती करण्यात आली रस्ता सुरक्षा अभियान २०२६ निमित्त हेल्मेट रॅली काढण्यात आली.**

हा कार्यक्रम मोठ्या संख्येमध्ये संपन्न झाला यावेळी मोटार वाहन निरीक्षक गणेश पिंगळे यांनी दुचाकी वाहनधारकांना प्रवासादरम्यान हेल्मेट लावूनच प्रवास करावा असे आवाहन करण्यात आले. हेल्मेट लावल्यामुळे रस्त्यावरील अपघाताचा प्रमाण कमी होईल ह्या भावनेने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमात अधिकाऱ्यांनी सुद्धा टू व्हीलर वर हेल्मेट लावून प्रवास केला व रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्यांना याबाबत मार्गदर्शन केले. हेल्मेट मुळे अपघात झाला तरी जीव वाचू शकतो असा अनमोल सल्ला त्यांनी दोन चाकी वाहनधारकांना दिला. यावेळी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी परविन बागडे, मोटर वाहन निरीक्षक गणेश पिंगळे, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक अश्विनी जोगदंड, पुरुषोत्तम शेवाळे, महेश वर्मा, उमेश साळुंखे, सागर पाटील, संतोष सूर्यवंशी, पांडुरंग पाटील आदी उपस्थित होते.